सकाळ
सांगली, सोमवार, २५ जून २०१८ | ३

## रामानंदनगर महाविद्यालयात योग दिन

**अंकलखोप :** रामानंदनगर (ता. पलूस) येथे आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त ए. एस. सी. कॉलेजमध्ये योगा दिनाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात सर्व विद्यार्थी, राष्ट्रीय छात्र सेना सेनेचे विद्यार्थी (एन. सी. सी.), राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी मोठ्या उत्साहात योगा केला. शारीरिक शिक्षण संचालक व केअर टेकर ऑफिसर प्रा. संदेश दौंडे यांनी उत्कृष्टरित्या संयोजन केले.

सकाळ
सांगली, बुधवार, २७ जून २०१८ | ३

## रामानंदनगरमध्ये अमली पदार्थ विरोधी दिन

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर येथे ए. एस. सी. महाविद्यालयातील तरुण तरुण-तरुणींसाठी अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त महाविद्यालयात प्राध्यापक ए. बी. माने यांचे व्याख्यान झाले. आजची युवा पिढी व्यसनाधिनतेकडे जास्त ओढली गेली आहे. मोठमोठ्या शहरात कार्यक्रम हा मद्य सेवनच करून सेलिब्रेट केला जात आहे. हे तरुण पिढीसाठी अतिशय घातक असून यातून लोकांच्यात प्रबोधन होण्यासाठी व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन झाले.

पुण्यनगरी smart Sangli ३ दिनांक: 28/06/2018

# पलूसमधील महाविद्यालयांत प्रवेश सुरू

**अंकलखोप / वार्ताहर**

आजच्या महागाईच्या काळात मुलांना शिक्षण देताना पालकांच्या बजेटला झळ बसत आहे. विविध फी, डोनेशनच्या नावाखाली खासगी शिक्षण संस्थांकडून पालकांची लूट होत असते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी पलूस तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्यार्थी संघर्ष यात्रेनंतर विद्यार्थी संघटना, शिक्षण विभाग, तहसीलदार, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्यामध्ये प्रवेश प्रक्रिये संदर्भात बैठक झाली. यामध्ये शिक्षण विभागाने दिलेल्या गाईड लाईननुसार तालुक्यातील सर्वच महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू झाली.

पाल्यांना दर्जेदार शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा, यासाठी पालक आग्रही असून सर्वच महाविद्यालयात विद्यार्थी, पालकांनी प्रवेशासाठी गर्दी केली आहे. महाविद्यालयात आल्यानंतर प्रवेशासाठी गोंधळ उडू नये, यासाठी यावेळी रामानंदनगर येथील आर्टस, सायन्स अँन्ड कॉमर्स महाविद्यालयात प्रत्येक वर्गाच्या प्रवेशासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध केले आहेत. कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा, याबाबत तज्ञ शिक्षकांमार्फत समुपदेशन करण्यात येत आहे.

4 पुण्यनगरी smart Sangli दिनांक:- 28/06/2018

# व्यसनामुळे तात्पुरती मजा कायमची सजा

## अभिजीत माने

**पलूस / प्रतिनिधी**

ए. एस. सी. कॉलेज रामानंदनगर मध्ये एन. एस. एस., एन. सी. सी. व जिमखाना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमात प्राध्यापक अभिजीत माने यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.



**पलूस : अंमली पदार्थविरोधीदिनी कार्यक्रमात बोलताना अभिजीत माने.**

तरुण-तरुणींसाठी अंमली पदार्थ शरीरासाठी कसे घातक आहेत याची माहिती सांगितली. आजची युवा पिढी व्यसनाधिनतेकडे जास्त ओढली गेली आहे.

मोठमोठ्या शहरात कॉलेजमध्ये शिकत असणारे विद्यार्थी मित्रांचा वाढदिवस, एखादा कार्यक्रम हा मद्य सेवन करून सेलिब्रेट करत आहेत. हे तरुण पिढीसाठी अतिशय घातक असून व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी लोकांच्यात प्रबोधन करण्यासाठी या व्याख्यानाचे आयोजन केले असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व केअर टेकर ऑफिसर प्रा. संदेश दौंड यांनी केले. डॉ. काकासाहेब भोसले यांनी आभार मानले. महाविद्यालयात प्रबोधनपर फेरी, पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

सकाळ सांगली, शनिवार, ३० जून २०१८

## रामानंदनगर महाविद्यालयात व्याख्यान

**कुंडल :** व्यसनामुळे तात्पुरती मजा वाटली तरी ही आयुष्यभर कायमची सजा बनते, असे मत प्रा. अभिजित माने यांनी केले. रामानंदनगर येथे ए. एस. सी. कॉलेजमध्ये एन. एस. एस., एन. सी. सी. व जिमखाना विभागातर्फे आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी साजरा झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्रा. संदेश दौंड, डॉ. काकासाहेब भोसले उपस्थित होते.

३ सकाळ सांगली, शनिवार, ३० जून २०१८

# नीलकंठ डहाळे यांना पीएच.डी.



किर्लोस्करवाडी : रामानंदनगर येथील आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमधील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. नीलकंठ डहाळे यांनी शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळवली. 'थीम ऑफ सोशल कॉन्शसनेस अँड प्रोटेस्ट इन द सिलेक्ट नोवेल्स ऑफ रिचर्ड अँड बाबूराव बागुल' विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. डॉ. पी. एम. पाटील यांचे मार्गदर्शन, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, डॉ. एम. ए. शेख, डॉ. पी. ए. अत्तार, प्रा. जी. जी. चव्हाण यांचे सहकार्य लाभले. आनंद साळुंखे, अमोल आळसंदकर, विजय मरले, रवी अवताडे यांनीही सहकार्य केले.

केसरी

११ जुलै २०१८



पलूस तालुक्यातील रामानंदनगर परिसरात रेल्वे स्टेशनच्या पाठीमागे वृक्ष लागवड करताना महेंद्र लाड, सरपंच संदीप जाधव, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य डॉ. विद्या दौडवाड आदी.

# रामानंदनगर येथे वृक्षलागवड उपक्रम

**पलूस : प्रतिनिधी**

पर्यावरण समतोल राखण्यासाठी पलूस तालुक्यातील रामानंदनगर येथील ग्रामपंचायत, ए. एस. सी. कॉलेज, स्वारा विद्यालय, भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने रामानंदनगर परिसरात रेल्वे स्टेशनच्या पाठीमागे वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र लाड यांच्यासह सरपंच संदीप जाधव, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य डॉ. विद्या दौडवाड, डॉ. समृध्दी मेथा, डॉ. स्वप्नील मेथा, सुनील तुपे, युनूस लांडगे, अशोक जाधव, प्रशांत नलवडे, जहाँगीर कोल्हापुरे, उपसरपंच रंजना कदम, मुमताज इनामदार, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ए. एस. सी. कॉलेज, स्वा. रा. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून वृक्ष लागवडीसाठी ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. भारती विद्यापीठ दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत-स्वस्थ भारत, झाडे लावा झाडे जगवा, प्लास्टिक मुक्तीबाबत पथनाट्य सादर केले. सोहिल शेट्टी, अनुराधा शिंदे, गीतिका भरतवाज, स्वप्निल शिंदे, प्रथमेश नानल, नॅन्सी बुडाकोटी, अपूर्वा तपास, क्षितिज शेठे यांनी पथनाट्याद्वारे समाजात जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी किर्लोस्कर कंपनीच्या भिंतीवर, मराठी शाळेच्या भिंतीवर झाडांची चित्रे काढून, झाडापासून होणारे फायदे, वृक्ष लागवडीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. संयोजन प्रा. संदेश दौंडे, संतोष तारळेकर, ग्रामपंचायत, रयत संकुल, भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय यांनी संयुक्तपणे केले.

दि. ११/७/२०१८

पुण्य नगरी



रामानंदनगर : वृक्षलागवड करताना महेंद्र लाड, संदीप जाधव, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य विद्या दौडवाड.

# रामानंदनगरमध्ये वृक्ष लागवड

**पलूस / प्रतिनिधी :** रामानंदनगर येथे वृक्ष लागवड उपक्रम मोठ्या उत्साहात झाला. पर्यावरण समतोल राखण्यासाठी रामानंदनगर येथे ग्रामपंचायत रामानंदनगर, ए. एस. सी. कॉलेज, स्वा.रा. विद्यालय, भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. या वृक्षलागवडीसाठी प्रमुख पाहुणे म्हणून महेंद्रअप्पा लाड यांच्यासह सरपंच संदीप जाधव, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य विद्या दौडवाड, डॉ. समृध्दी मेथा, स्वप्नील मेथा, सुनील तुपे, युनुस लांडगे, अशोक जाधव, प्रशांत नलावडे, जहांगीर कोल्हापुरे, उपसरपंच रंजना कदम, मुमताज इनामदार सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ए. एस. सी. कॉलेज रामानंदनगर, स्वा. रा. विद्यालय रामानंदनगरच्या विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून वृक्ष लागवडीसाठी ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. या सर्व कार्यक्रमाचे संयोजन प्राध्यापक संदेश दौंडे, संतोष तारळेकर, ग्रामपंचायत रामानंदनगर, रयत संकुल, भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय, सांगली यांनी संयुक्तपणे केले.

सकाळ सांगली, सोमवार, १६ जुलै २०१८

अवतीभवती




**किर्लोस्करवाडी : रामानंदनगर येथे वृक्षारोपण करताना महेंद्र लाड, सरपंच संदीप जाधव, प्राचार्य डॉ. साळुंखे आदी.**

# रामानंदनगरमध्ये वृक्षारोपण उत्साहात

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर ग्रामपंचायत, महाविद्यालय, दंत महाविद्यालयातर्फे रेल्वे स्टेशन परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. प्रमुख पाहुणे महेंद्र लाड, सरपंच संदीप जाधव, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य डॉ. विद्या दौडवाड, डॉ. समृध्दी मेथा, डॉ. स्वप्नील मेथा, युनूस लांडगे, उपसरपंच रंजना कदम, मुमताज इनामदार, अशोक जाधव, प्रशांत नलवडे, जहांगीर कोल्हापूरे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी फेरी काढून वृक्षारोपणाविषयी जागृती केली, प्लास्टिक मुक्तीबाबत सेहील शेट्टी, अनुराधा शिंदे, गितीका भरतवाज, स्वप्निल शिंदे, प्रथमेश नानल, नॅन्सी बुडाकोटी, अपूर्वा तपास, शितिज शेठे यांनी पथनाट्य सादर केले. प्रा. संदेश दौंडे, संतोष तारळेकर आदींनी संयोजन केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, २० जुलै २०१८



# लोकसंख्या वाढीने पर्यावरणाचा समतोल बिघडला

**मोहन सदामते**

**पलूस / प्रतिनिधी**

जगाची लोकसंख्या वाढत आहे. भारताची लोकसंख्या वाढत आहे. पण पर्यायाने त्याप्रमाणे उत्पन्न मात्र वाढत नाही. जर आपले जीवनमान उंचवायचे असेल तर त्या प्रमाणात आपले उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. यासाठी लोकसंख्या नियंत्रित ठेवणे खूप महत्वाचे आहे. यावर निर्बंध एक काळाची गरज आहे. बेसुमार लोकसंख्यावाढीने पर्यावरण समतोल बिघडला असल्याची चिंता प्रा. डॉ. मोहन सदामते यांनी व्यक्त केली.

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या ए. एस. सी. कॉलेज रामानंदनगरमध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यानमाला झाली. निबंध स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्राचार्य सुरेश साळुंखे म्हणाले, ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणातच उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. त्या प्रमाणात लोकांनी उद्योगधंदे विविध प्रकारची कामे करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. काकासाहेब भोसले, डॉ. अण्णा पाटील, प्रा. संदेश दौंडे यांनी केले. सूत्रसंचालन एस. जे. माने यांनी केले.

दिनांक - 20-7-2018

दैनिक ललकार

# लोकसंख्या नियंत्रित ठेवणे महत्वाचे

## प्रा. मोहन सदामते

किर्लोस्करवाडी दि. १९ (वार्ताहर)- आज जगाची लोकसंख्या वाढत आहे भारताची लोकसंख्या वाढत आहे पर्यायाने त्याप्रमाणे उत्पन्न मात्र वाढत नसून जर आपले जीवनमान उंचवायचे असेल तर त्या प्रमाणात आपले उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे यासाठी लोकसंख्या नियंत्रित ठेवणे खूप महत्वाचे असून यावर निर्बंध एक काळाची गरज आहे असे मत प्रा. डॉ. मोहन सदामते यांनी व्यक्त केले. रामानंदनगर येथे ए.एस.सी.कालेजमध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डा. सुरेश साळुंखे यांनी ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्या प्रमाणातच उत्पन्न वाढविणे गरजेचे असून त्या प्रमाणात लोकांनी उद्योगधंदे विविध प्रकारची कामे करणे गरजेचे आहे असे मत मांडले जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले या कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. काकासाहेब भोसले अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. अण्णा पाटील ,राष्ट्रीय छात्र सेना चे केअर टेकर ऑफिसर प्राध्यापक संदेश दौंडे यांनी संयुक्तपणे केले सूत्रसंचालन प्राध्यापिका सौ.माने एस. जे. यांनी केले.



किर्लोस्करवाडी रामानंदनगर कॉलेजमध्ये प्राध्यापक डॉ.मोहन सदामते मार्गदर्शन करताना, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे ,प्राध्यापक डॉ. अण्णा पाटील.

पुढारी

दिनांक ९-८-२०१८

# डॉ.पतंगराव कदम यांचे कार्य आदर्श

## आमदार विश्वजित कदम : रामानंदनगरध्ये वह्या वाटप कार्यक्रम

**किर्लोस्करवाडी : प्रतिनिधी**

माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी रयत शिक्षण संस्थेचा एक घटक मानून आयुष्यभर सेवा केली. तसेच बहुजनांची मुले उच्चशिक्षित व्हावी यासाठी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्या कार्याचा आदर्श विद्यार्थ्यां समोर राहिला पाहिजे, असे प्रतिपादन आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी केले.

डॉ. कदम यांच्या वाढदिवसानिमित्त जमा झालेल्या वह्यांचे वाटप रामानंदनगर येथील आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, महेंद्र लाड, माधवराव मोहिते, सुधीर जाधव, डॉ. डी. डी. माने, संदीप जाधव, विजय आरबुने,




**किर्लोस्करवाडी : रामानंदनगर येथे आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये वह्या वाटप कार्यक्रमप्रसंगी बोलताना आमदार डॉ. विश्वजित कदम. (व्यासपीठावर) सुधीर जाधव, महेंद्र लाड, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, हणमंतराव चव्हाण.**

डॉ. मीनाक्षी सावंत, सरपंच संपत पाटील, प्राचार्य बी. डी. लाड, मुख्याध्यापिका मोरे उपस्थित होते. रयतचे दक्षिण विभागाचे निरीक्षक कृष्णा मालुसरे, युवराज सावंत यांचा निवडीबद्दल सत्कार करण्यात आला.

संयोजन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विद्याधर पाटील, उपप्राचार्य मोहन चव्हाण आणि प्राध्यापकांनी केले. शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.संजय पाटील यांनी आभार मानले.

लोकमत
सांगली
सांगली, गुरुवार, दि. ६ सप्टेंबर २०१८

# रामानंदनगरला महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पलूस** : रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पंधरादिवसीय महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन नूतन पोलीस उपनिरीक्षक अश्विनी पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील होते. यावेळी अश्विनी पाटील म्हणाल्या की, महिलांनी सक्षम होण्याचे मनावर घेणे गरजेचे आहे. पुरुषांची बरोबरी करताना स्वसंरक्षणासाठी सेल्फ डिफेन्स शिकणेही गरजेचे आहे.

कार्यक्रमात फिनिक्स स्पोर्टस् अँड करिअर अकॅडमीचे प्रमुख जावेद मुल्ला यांनी स्वसंरक्षणाबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच यशवंत स्पर्धा परीक्षा प्रबोधिनीचे अमित पाटील यांनी स्पर्धा परीक्षा आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी जिमखाना प्रमुख प्रा. संदेश दौंडे म्हणाले, स्वसंरक्षण ही काळाची गरज आहे. घरातून बाहेर पडल्यानंतर स्वसंरक्षणासाठी सक्षम असणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींनी शारीरिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी आहाराकडे लक्ष देण्याची गरज आहे. मुलींमध्ये पुरेसा आहार घेण्याचा अभाव दिसून येतो. विद्यार्थिनींनी सर्वच महाविद्यालयीन उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे.

महाविद्यालयात योगा केंद्रांचा सर्वांनी लाभ घ्यावा. विद्यार्थिनींनी योगा प्रशिक्षणाकडे करिअरच्यादृष्टीने जाणे गरजेचे आहे. यावेळी ऋतुजा सूर्यवंशी, बॉक्सिंग प्रशिक्षक संदीप नाझरे, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संदेश दौंडे, महिला सबलीकरण समिती प्रमुख प्रा. संध्या माने, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील, प्रा. काकासाहेब भोसले उपस्थित होते.

पुण्य नगरी ‖ गुरुवार, ६ सप्टेंबर २०१८ ‖ कोल्हापूर - सांगली



# रामानंदनगरमध्ये महिलांचे स्वसंरक्षण शिबीर

**पलूस / प्रतिनिधी**

रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस, सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पंधरा दिवसीय महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबीर झाले,

शिबिराचे उद्‌घाटन अश्विनी पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील होते. पोलीस उपनिरीक्षक अश्विनी पाटील म्हणाल्या, महिलांनी सक्षम होण्याचे मनावर घेणे गरजेचे आहे. पुरुषांची बरोबरी करताना स्वसंरक्षणासाठी सेल्फ डिफेन्स शिकणे गरजेचे आहे. कार्यक्रमात फिनिक्स स्पोर्टस अ‍ॅन्ड करिअर अ‍ॅकॅडमीचे प्रमुख जावेद मुल्ला यांनी स्वसंरक्षण प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच यशवंत स्पर्धा परीक्षा प्रबोधिनीचे अमित पाटील यांनी स्पर्धा परीक्षा आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण याविषयी मार्गदर्शन केले. संदेश दौंडे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी योगा प्रशिक्षणाकडे करिअरच्यादृष्टीने जाणे गरजेचे आहे. कार्यक्रमास प्रशिक्षक जावेद मुल्ला, पोलीस उपनिरीक्षक अश्विनी पाटील, ऋतुजा सूर्यवंशी, बॉक्सिंग प्रशिक्षक संदीप नाझरे, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संदेश दौंडे, महिला सबलीकरण समिती प्रमुख संध्या माने, उपप्राचार्य डॉ.व्ही.बी. पाटील, काकासाहेब भोसले उपस्थित होते. उपक्रमास विद्यार्थिनींनी प्रतिसाद देत स्वसंरक्षणाचा धडा यशस्वीरित्या पूर्ण करण्याचा निश्चय केला.

लोकमत सांगली, शुक्रवार, दि. १२ ऑक्टोबर २०१८

# 'रयत'ने दिली महाराष्ट्राला शैक्षणिक दिशा : पाटील

## रामानंदनगर येथे शताब्दी सोहळा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**किर्लोस्करवाडी :** गेली शंभर वर्षे कर्मवीरअण्णांचे विचार आणि रयत शिक्षण संस्थेच्या संस्कारांनी महाराष्ट्राला शैक्षणिक दिशा देण्याचे काम केले आहे. तसेच आजच्या पिढीनेही अण्णांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन निपाणीचे माजी आमदार काकासाहेब पाटील यांनी केले.

पलूस तालुक्यातील रामानंदनगर येथील आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून काकासाहेब पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. डी. डी. माने होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य बी. डी. लाड, मुख्याध्यापिका एस. जी. मोरे, प्रा. यु. एस. बिराज, प्राचार्य पी. एन. नलवडे, श्रीकांत लाड, व्ही. वाय. पाटील, गणपतराव सावंत, शहाजी जाधव, निशिकांत पाटील, अण्णासाहेब पाटील, जीवन नार्वेकर, पी. एम. चव्हाण, संपतराव पवार, डॉ. व्ही. बी. पाटील, एम. बी. चव्हाण आदी उपस्थित होते.

काकासाहेब पाटील पुढे म्हणाले, रयत शिक्षण संस्थेने गेल्या शंभर वर्षांत चांगले विद्यार्थी घडवले आहेत. माझ्यामध्ये पुरोगामी विचारांची पेरणी रामानंदनगर महाविद्यालयाने केली. कर्नाटकच्या विधानसभेत शैक्षणिक धोरणे ठरवताना माझ्यापुढे रयत शिक्षण संस्थेचा आदर्श होता. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी स्वागत केले , तर संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे संयोजन स्थानिक व्यवस्थापन समिती, रयत संकुल, रयत सेवक वृंद, व विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे केले. यावेळी शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दि० १५/१०/२०१८

पुण्यनगरी

# कर्मवीरांचे चरित्र हीच आमची प्रेरणा

## काकासाहेब पाटील

पलूस / प्रतिनिधी

गेली शंभर वर्षे कर्मवीर अण्णांचे विचार आणि रयत शिक्षण संस्थेच्या संस्कारांनी महाराष्ट्राला शैक्षणिक दिशा देण्याचे काम केले आहे. आजच्या पिढीनेही अण्णांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन निपाणीचे माजी आमदार काकासाहेब पाटील यांनी केले.

रामानंदनगर येथे रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. डी. डी. माने होते. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, प्राचार्य बी. डी. लाड, मुख्याध्यापिका एस. जी. मोरे, प्रा. यु. एस. बिराज, प्राचार्य पी.एन. नलवडे, श्रीकांत लाड, व्ही. वाय. पाटील, गणपतराव सावंत, शहाजी जाधव, निशिकांत पाटील, अण्णासाहेब पाटील, जीवन नार्वेकर, पी. एम. चव्हाण, डॉ. व्ही. बी. पाटील, एम. बी. चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी प्रकल्पांतर्गत महाविद्यालयाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामाचा प्रारंभ काकासाहेब पाटील यांच्याहस्ते करण्यात आला. याप्रसंगी पाटील म्हणाले, रयत शिक्षण संस्थेने गेल्या शंभर वर्षात चांगले विद्यार्थी घडवले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. डी. माने यांनी रयत शिक्षण संस्थेने १०० वर्षे महाराष्ट्राची सेवा केल्याचे भावोद्गार काढले. स्वागत प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, आभार संजय पाटील यांनी मानले.

दि. २/११/२०१८

पुण्य नगरी

# अक्षय पाटीलची विद्यापीठ संघात निवड

**किर्लोस्करवाडी / वार्ताहर :** अक्षय पाटीलची ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेस शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. रामानंदनगर येथील आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजचा सायकलपटू अक्षय हणमंत पाटील, (बी.ए भाग ३) याने शिराळा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठच्या आंतर विभागीय सायकलिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकविला आहे. अक्षय पाटील याची बिकानेर, राजस्थान येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसासाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड करण्यात आली आहे. तो सध्या टिम के २ संघातून सायकलींगचा सराव करत असून यासाठी त्याला किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेडचे सहकार्य लाभले आहे. प्राचार्य डॉ. सुनील साळुंखे, जिमखाना विभाग प्रमुख, प्रा. संदेश दौंडे, प्रा. सुरज पाटील, दिलीप माने यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

रविवार दि. ३०/१२/२०१८



नवी मुंबई : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात तीनदिवसीय रयत विज्ञान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन शनिवारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते झाले.

**दैनिक ललकार** २०/१२/२०१८

# ऊसतोडणी मजुरांच्या मुलांच्या शिक्षणासाठी रामानंदनगर कॉलेजचा किडस् प्रकल्प

पलूस दि. १९ (वार्ताहर) - सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने आर्ट्स सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) येथील विद्यार्थ्यांनी ऊस तोडणी मजुरांच्या मुलांसाठी कर्मवीर इम्पेटस डेव्हलपमेंट स्कीम (KIDS) अंतर्गत प्रा.बी.एस.सकटे यांच्या पुढाकाराने ज्ञानदानाचे काम हाती घेतले आहे.

या उपक्रम अंतर्गत तीन महिने हे विद्यार्थी आपल्या नियमित शिक्षणाबरोबरच ज्ञानदानाचे काम करतील.

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बालकांना साखर शाळेस येण्यास उद्युक्त करणे, त्यांना आरोग्य मुलभूत शिक्षणाची ओळख करून देऊन देण्याचे काम करतील.

इंग्रजी, गणित, विज्ञान या विषयांची ओळख करून देवून या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करतील.

या उपक्रम अंतर्गत क्रांती साखर शाळा येथे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



या महत्वाकांक्षी उपक्रमाला प्राचार्य. डॉ. एस.टी.साळुंखे, इंग्रजी विभाग प्रमुख एन.जे.डहाळे, उपप्राचार्य डॉ. व्ही.बी.पाटील, उपप्राचार्य एम.बी.चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुण्यनगरी दि. ११/१/२०१९

# रामानंदनगरमधील शिबिरात २८ जणांचे रक्तदान

**दुधोंडी / वार्ताहर :** रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस, सायन्स, कॉमर्स कॉलेजमध्ये डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचे उद्घाटन सरपंच प्रशांत नलावडे, उपप्राचार्य व्ही. बी. पाटील, प्रा. मोहन चव्हाण, पर्यवेक्षक संजय पाटील, एनसीसी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरामध्ये २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. भारती ब्लड बँकेच्या कर्मचाऱ्यांना पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता केली. संयोजन एनसीसी केअर टेकर ऑफिसर संदेश दौंडे, एनएसएस प्रमुख काकासाहेब भोसले, प्रा. संध्या माने यांनी केले.

मंगळवार दि. 2-9-2019

# ललकार

## रामानंदनगर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बनवलेले सायकल फवारणी यंत्र प्रथम ४ थ्या रयत विज्ञान परिषदेत प्रथम

रामानंदनगर दि. १- आजच्या युवा पिढीला जर आपण विचारले तु मोठा झाल्यावर काय होणार ?तर उत्तर मिळते, मी डॉक्टर, वकील, इंजिनिअर होणार. पण कुणी म्हणत नाही मी शेतकरी होणार. शेतीमधील वाढता खर्च, लागणारे कष्ट व त्याचबरोबर मजुरांचे दुर्भिक्ष यामुळेच सर्वजण शेतीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात.

ही स्थिती लक्षात घेऊन रामानंदनगर महाविद्यालयाचे विद्यार्थी शेतकऱ्यांच्या पुढे आले आहेत. महाविद्यालयाच्या ज्युनियर विभागातील ओंकार पाटील, केतन पवार या विद्यार्थ्यांनी सायकल फवारणी यंत्राची निर्मिती केली आहे.



हे यंत्र बनवण्यासाठी त्यांना आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, फिजिक्स विभागाचे प्रा.जे.बी. थोरात, प्रा. प्रशांत भाग्यवंत, प्रा.केतन म्हस्के यांच्या यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या ४थ्या रयत विज्ञान परिषदेत या सायकल फवारणी यंत्राला प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

या यंत्राचा उपयोग औषध फवारणी बरोबरच कोळपणी साठी होणार आहे. तसेच औषध फवारणी पंप पाठीवर घेऊन फिरण्याचे श्रम वाचणार आहेत. तसेच या यंत्राचा वापर महिलाही अगदी सुलभपणे करू शकणार आहेत. तसेच या यंत्राद्वारे उंच ऊस पिकावरही औषध फवारणी सहज शक्य होणार आहे. गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रात २७२शेतकरी औषध फवारणी मुळे मृत्यूमुखी पडले. याचा विचार करून बनवलेल्या या यंत्रामुळे यंत्रचालक स्प्रे नोझल पासून सुरक्षित अंतरावर राहील याची काळजी घेण्यात आली आहे.

लोकमत
सांगली
सांगली, सोमवार, दि. ७ जानेवारी २०१९

टाकाऊ वस्तूंपासून निर्मिती : रयत विज्ञान परिषदेत प्रथम क्रमांक

# रामानंदनगरच्या विद्यार्थ्यांनी बनविले सायकल फवारणी यंत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**किर्लोस्करवाडी :** शेतीमधील वाढता खर्च, लागणारे कष्ट व त्याचबरोबर मजुरांची वानवा, यामुळे आज युवापिढी शेतीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करताना दिसते. मात्र ही स्थिती लक्षात घेऊन रामानंदनगर (ता. पलूस) महाविद्यालयाचे विद्यार्थी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढे आले आहेत. महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील ओंकार पाटील, केतन पवार या विद्यार्थ्यांनी सायकल फवारणी यंत्राची निर्मिती केली आहे. या यंत्राने चौथ्या रयत विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकावला आहे.



रामानंदनगर (ता. पलूस) येथील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सायकल फवारणी यंत्राचे डॉ. सुरेश साळुंखे व प्राध्यापकांनी कौतुक केले.

आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, फिजिक्स विभागाचे प्रा. जे. बी. थोरात, प्रा. प्रशांत भाग्यवंत, प्रा. केतन म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यंत्र तयार केले. या यंत्राचा उपयोग औषध फवारणीबरोबरच कोळपणीसाठी होणार आहे. तसेच औषध फवारणी पंप पाठीवर घेऊन फिरण्याचे श्रम वाचणार आहेत. या यंत्राचा वापर महिलाही सुलभपणे करू शकणार आहेत. तसेच या यंत्राद्वारे उंच ऊस पिकावरही औषध फवारणी सहजशक्य होणार आहे.

गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रात २७२ शेतकरी औषध फवारणीमुळे मृत्युमुखी पडले. याचा विचार करून बनविलेल्या या यंत्रामुळे यंत्रचालक स्प्रे नोझलपासून सुरक्षित अंतरावर राहू शकणार आहे.

हे यंत्र टाकाऊ वस्तूंपासून बनविले असून यासाठी साधारण तीन हजार रुपये खर्च आला.

रयत शिक्षण संस्थेच्यावतीने घेण्यात आलेल्या चौथ्या रयत विज्ञान परिषदेत या सायकल फवारणी यंत्राला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

या यंत्रामुळे शेतकऱ्यांचे श्रम कमी होऊन वेळ आणि पैशाची बचत होणार असल्याचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी सांगितले.

पुढारी

दि. १८/१/२०१९

## रामानंदनगर येथे रक्तदान शिबीर

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर येथील ए. एस. सी. कॉलेजमध्ये डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरात २८ जणांनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे संयोजन केले. सरपंच प्रशांत नलावडे, उपप्राचार्य व्ही. बी. पाटील, प्रा. मोहन चव्हाण, पर्यवेक्षक संजय पाटील व एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते. भारती ब्लड बँकेच्या कर्मचाऱ्यांना पुस्तक देऊन शिबिराची सांगता केली. संयोजन संदेश दौंडि, एन. एस. एस. प्रमुख काकासाहेब भोसले, प्रा. संध्या माने यांनी केले.

[redacted]

लोकमत
सांगली, रविवार
दि. २० जानेवारी २०१९



# रामानंदनगरमध्ये विज्ञान मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**किर्लोस्करवाडी :** ग्रामीण भागातील शाळा, विद्यालयांमध्ये सुसज्ज प्रयोगशाळांचा अभाव आहे. या विज्ञान साहित्याच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या नवीन अभ्यासक्रमातील प्रयोग समजून घेणे अवघड जात आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस् सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज पुढे सरसावले आहे.

रामानंदनगर कॉलेजमध्ये इ. १० वी विज्ञान विषय मार्गदर्शन व प्रयोग पूर्तता कार्यक्रम पार पडला. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या संकल्पनेतून राबविलेल्या या उपक्रमअंतर्गत नागराळे, पुणदी, दुधोंडी, रामानंदनगर, घोगाव, बुर्ली, आमणापूर येथील माध्यमिक विद्यालयांनी सहभागी घेतला. भौतिक, रसायन, जीव, इलेक्ट्रॉनिक्स या विभागात प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. याचा विद्यार्थ्यांना चांगला फायदा होणार आहे.

तरुण भारत
सांगली
मंगळवार दि. २२ जानेवारी २०१९

# रामानंदनगर कॉलेजमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी विज्ञान मार्गदर्शन



पलूस : प्रयोगशाळेत माहिती देताना शिक्षक.

प्रतिनिधी
पलूस

ग्रामीण भागातील शाळा विद्यालयांमध्ये सुसज्ज प्रयोगशाळांचा अभाव आहे. या विज्ञान साहित्याच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या नवीन अभ्यासक्रमातील प्रयोग समजून घेणे अवघड जात आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी पलुस तालुक्यातील रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आटर्स सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज पुढे सरसावले आहे. रामानंदनगर कॉलेजमध्ये इ.१० वी विज्ञान विषय मार्गदर्शन व प्रयोग पुर्तता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रम अंतर्गत नागराळे, पुणदी, दुधोंडी, रामानंदनगर, घोगाव, बुर्ली, आमणापूर येथील माध्यमिक विद्यालयांनी सहभागी घेतला. इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत असणय्रा विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमामुळे येत असणय्रा अडचणी लक्षात घेऊन भौतीक, रसायन, जीव, इलेक्ट्रॉनिक्स या विभागात प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन करण्यात आले.

मंगळवार दि. २२ जानेवारी २०१९

हसत खेळत अन्यायांचा प्रतिकार करणारे स्वतंत्र विचाराचे हिरक महोत्सवी दैनिक

# ललकार

संस्थापक संपादक - श्री. बापूराव द. खराडे

## पुणदी येथे रामानंदनगर महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीरास प्रारंभ

पलूस दि. २१ (वार्ताहर) - रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या वतीने पलुस तालुक्यातील पुणदी तर्फ वाळवा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन रयतच्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र आप्पा लाड यांच्या हस्ते, उपप्राचार्य प्रा.एम.बी.चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली, उपप्राचार्य डॉ. व्ही.बी.पाटील, सरपंच संपत पाटील, उपसरपंच वैशाली नांगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.



पुणदी येथे श्रमसंस्कार शिबीरात हाती खराटा स्वयंसेविकांचे मनोबल वाढवताना महेंद्र आप्पा लाड, सरपंच संपत पाटील आदी.

या शिबिरात सहभागी स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनींनी पुणदी गावातील स्मशानभूमी, नदीवरील घाट व रस्त्याची स्वच्छता, हनुमान मंदिर परिसरातील घाट व रस्त्याची स्वच्छता, वृक्षारोपण केलेल्या परिसरात प्लास्टिक निर्मुलन जलस्वच्छता बाबत महिलांचे प्रबोधन जैन मठ परिसरात स्वच्छता, गावातील ग्रामस्वच्छता व गाजरगवत निर्मुलन असे उपक्रम हाती घेण्यात आले.

या शिबिरात आयोजित व्याख्यानमालेत डॉ बी जी कोरे यांचे 'अध्यात्म आणि शिक्षण', डॉ.मिनाक्षी सावंत 'आरोग्य व आहार', डी.एस. जाधव 'शासकीय कृषी योजनांची माहिती साहित्यिक रवी राजमाने 'कथाकथन', डॉ. विजय माने 'युवाशक्ती आणि विकास', संदीप नाझरे 'श्रमसंस्कारातून व्यक्तीमत्व विकास', बाबासाहेब नदाफ 'राष्ट्र उभारणीतील युवकांचे योगदान आदी प्रबोधनपर व्याख्याने संपन्न झाली.

या शिबिराच्या संयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुरेश साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.

या शिबिराचे आयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. काकासाहेब भोसले, प्रा. संध्या माने, प्रा.उमेश शेळके, सर्व प्राध्यापक, रयत सेवक सरपंच, उपसरपंच पुणदी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य,ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.

हसत खेळत अन्यायाचा प्रतिकार करणारे स्वतंत्र विचाराचे हिरक महोत्सवी दैनिक

# ललकार

• गुरूवार दि. २४ जानेवारी २०१९

## पुणदी येथे श्रमसंस्कार शिबीर संपन्न

पलूस दि. २३ (वार्ताहर) - श्रमसंस्कार शिबीरातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास- जे.के.बापू जाधव, रामानंदनगर कॉलेजच्या पुणदी येथील श्रमसंस्कार शिबीराचा समारोप.



पुणदी येथील श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी बोलताना जे.के.बापू जाधव

श्रमसंस्कार शिबीराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण व्यक्तीमत्व विकास घडण्यास मदत होते, असे प्रतिपादन रयतच्या जनरल बॉडीचे सदस्य जे. के. बापू जाधव यांनी केले.

रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या वतीने पुणदी तर्फ वाळवा (ता.पलुस) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

विद्यार्थ्यांनी शिबीराच्या माध्यमातून श्रमसंस्कार जाणावे. व श्रमाने आपले राष्ट्र विकसित करावे. असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी व्यक्त केले. या समारोप प्रसंगी पुणदीचे पहिले लोकनियुक्त सरपंच संपत पाटील यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे ऋण व्यक्त केले.

या शिबिराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. काकासाहेब भोसले, प्रा. संध्या माने, प्रा.उमेश शेळके, प्रा.डॉ. बी.ए. सोनार सर्व प्राध्यापक, रयत सेवक सरपंच, उपसरपंच वैशाली नांगरे पुणदी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी | देश-विदेश | सोमवार, २८ जानेवारी २०१९



रामानंदनगर : आर्टस, सायन्स, कॉमर्स, महाविद्यालयाच्या विज्ञान उपक्रमात दुधोंडी हायस्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखवताना प्रा. एस. एस. चव्हाण, विजया जाधव.

# रामानंदनगरमध्ये विज्ञानविषयक मार्गदर्शन

**किर्लोस्करवाडी :** पलूस तालुक्यातील रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये विज्ञानविषयक मार्गदर्शन कार्यक्रम झाला. कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाअंतर्गत नागराळे, पुणदी, दुधोंडी, रामानंदनगर, घोगाव, बुर्ली, आमणापूर येथील माध्यमिक विद्यालयांनी सहभाग घेतला. दहावीत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमामुळे येत असणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन भौतिक, रसायन, जीव, इलेक्ट्रॉनिक्स या विभागात प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच या विद्यार्थ्यांना त्यांच्या दहावी बोर्ड परीक्षेवेळी साहित्य व रसायने देवून सहकार्य करणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. सुनील साळुंखे यांनी दिली. या उपक्रमात पर्यवेक्षक प्रा.संजय पाटील, प्रा. एस.एस. चव्हाण, प्रा.एस.बी. बाबर-भाटे, प्रा. पी.व्ही. वाघमारे, प्रा. यू. एस.बिराज, प्रा. एस. बी. पाचोरे या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तरुण भारत दि.२८-१-२०१९



पलूस : शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना जे. के. बापू जाधव बाजूस अन्य.

## श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास

**पलूस :** श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण व्यक्तीमत्व विकास घडण्यास मदत होते, असे प्रतिपादन रयतच्या जनरल बॉडीचे सदस्य जे.के.बापू जाधव यांनी केले. रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या वतीने पुणदी तर्फ वाळवा (ता.पलुस) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी शिबिराच्या माध्यमातून श्रमसंस्कार जाणावे व श्रमाने आपले राष्ट्र विकसित करावे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी व्यक्त केले. या समारोप प्रसंगी पुणदी.चे पहिले लोकनियुक्त सरपंच संपत पाटील यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे ऋण व्यक्त केले.

या शिबिराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. काकासाहेब भोसले, प्रा. संध्या माने, प्रा. उमेश शेळके, प्रा.डॉ. बी.ए. सोनार सर्व प्राध्यापक, रयत सेवक सरपंच, उपसरपंच वैशाली नांगरे पुणदी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, स्वयंसेवक उपस्थित होते.

पुढारी
सोमवार, २८ जानेवारी २०१९




**रामानंदनगर : येथील आर्टस्, सायन्स, कॉमर्स महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मतदार जागृती रॅली काढली.**

## रामानंदनगर कॉलेजमध्ये राष्ट्रीय मतदार दिन

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर येथील आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नवमतदारांना, शिक्षक शिक्षकेतर सेवकांना, मतदार प्रतिज्ञा व शपथ प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी दिली. मतदार प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन करण्यात आले. निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदी स्पर्धा घेण्यात आल्या. भिंतीपत्रके प्रसिद्ध केली. तसेच रामानंदनगर परिसरात प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २०० विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संयोजन राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांनी संयुक्तरित्या केले.

पुण्यनगरी दि. २८-१-२०१९




रामानंदनगर : कॉलेजच्यावतीने काढलेली मतदान जनजागृती रॅली

# रामानंदनगरला मतदार जनजागृती रॅली

**दुधोंडी / वार्ताहर :** रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये दिनांक २५ जानेवारी १९ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नवमतदारांना, शिक्षक शिक्षकेत्तर सेवकांना, मतदार प्रतिज्ञा व शपथ प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी दिली. मतदार प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन करण्यात आले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदी स्पर्धा घेण्यात आल्या. भिंती पत्रके प्रसिद्ध केली. तसेच रामानंदनगर परिसरात प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दोनशे विद्यार्थी, ४५ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांनी संयुक्तरित्या केले.

लोकमत सांगली, गुरुवार, दि. ३१ जानेवारी २०१९

# पुणदी येथे श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**किर्लोस्करवाडी** : रामानंदनगर (ता. पलूस) येथील आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजतर्फे पुणदी तर्फ वाळवा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

'रयत'च्या जनरल बॉडीचे सदस्य महेंद्र लाड यांनी उद्घाटन केले. यावेळी प्रा. एम. बी. चव्हाण, डॉ. व्ही. बी. पाटील, संपत पाटील, वैशाली नांगरे उपस्थित होते.

सहभागी स्वयंसेवक विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पुणदीतील स्मशानभूमी, नदीवरील घाट व रस्त्याची स्वच्छता, केली. तसेच वृक्षारोपण केलेल्या परिसरात प्लास्टिक निर्मूलन, जलस्वच्छता याबाबत प्रबोधन केले. यावेळी प्लास्टिकच्या धोक्याबाबत स्वसंसेवकांनी माहिती दिली.

शिबिरात डॉ. बी. जी. कोरे यांचे 'अध्यात्म आणि शिक्षण' विषयावर, डॉ. मीनाक्षी सावंत यांचे 'आरोग्य व आहार', डी. एस. जाधव यांचे 'शासकीय कृषी योजनांची माहिती', साहित्यिक रवी राजमाने यांचे 'कथाकथन', डॉ. विजय माने यांचे 'युवाशक्ती आणि विकास', संदीप नाझरे यांचे 'श्रमसंस्कारातून व्यक्तिमत्त्व विकास', तर बाबासाहेब नदाफ यांचे 'राष्ट्र उभारणीतील युवकांचे योगदान' या विषयावर व्याख्यान झाले.

दैनिक ललकार १/२/२०१९

# रामानंदनगर कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

पलूस दि. ३१ - अध्यापन तंत्राच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान उपयुक्त-प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, रामानंदनगर कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात.

पलुस तालुक्यातील रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस् सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेजचा प्राणीशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमाअंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. संशोधनात्मक अध्यापन शास्त्र या विषयावर ही कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पलुस कॉलेजचे प्रा.डॉ. एस.एस. पाटील, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे उपस्थित होते.



रामानंदनगर येथे संशोधनात्मक अध्यापन शास्त्र कार्यशाळेत बोलताना प्रा.डॉ. सुरेश साळुंखे कर्मवीर मंचावर विषयतज्ज्ञ मांन्यवर.

या कार्यशाळेत डॉ. एस एम कुंभार, प्रा.ए.बी.माने या विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचे संयोजन प्रा.ए.आर.औंधकर, प्रा. ए.बी.माने, डॉ. टी.एस. भोसले, डॉ. एस.बी.पोळ, डॉ. बी.ए.सोनार यांनी केले.

बदलत्या तंत्रज्ञानाने शिक्षण सुखकर आणि वेगवान झाले आहे असल्याचा मनोदय यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. एस.एस. पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी प्राचार्य डॉ.साळुंखे म्हणाले, काळ झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे आलेली अस्थिरता लक्षात घेता तुमच्या जॉबमध्ये होणाऱ्या बदलांचा विचार करता बहू विषयांचे ज्ञान आवश्यक आहे. सायन्सच्या विद्यार्थ्यांना अकांऊटचेही ज्ञान असणे गरजेचे आहे. शाखांचा रेषा आता पुसट होत असून शासनाने अँटोनॉमस धोरण स्विकारले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार आता आर्ट्स सायन्स कॉमर्स या सगळ्यांचा अभ्यास एकत्रित करणे शक्य आहे.

गुगल क्लासरूम, युट्यूब, ऑनलाईन टिचींग हे तंत्र आता आपण विकसित केले पाहिजे. या पुढील काळात शिक्षकांना अध्यापन तंत्राच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

पुण्यनगरी दि. 9/2/2019

# अध्यापन तंत्राच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान उपयुक्त

## सुरेश साळुंखे

**दुधोंडी / वार्ताहर**

काळ झपाट्याने बदलत आहे. बाजारपेठेतील अस्थिरता लक्षात घेता कामाच्या पद्धतीमध्ये होणाऱ्या बदलांचा विचार करणे काळाची गरज बनली आहे.

विज्ञानच्या विद्यार्थ्यांना अकौंटचेही ज्ञान असणे गरजेचे आहे. शाखांच्या रेषा आता पुसट होत आहेत. शासनाने अॅटोनॉमस धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार आता सगळ्यांचा अभ्यास एकत्रित करणे शक्य आहे. गुगल क्लासरूम, यु



रामानंदनगर : संशोधनात्मक अध्यापन शास्त्र कार्यशाळेत बोलताना डॉ. सुरेश साळुंखे. व्यासपीठावर मान्यवर.

ट्यूब, ऑनलाईन टिचींग हे तंत्र आता विकसित केले पाहिजे. शिक्षकांना अध्यापन तंत्राच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी केले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा प्राणीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय संशोधनात्मक अध्यापन शास्त्र या विषयावर कार्यशाळा झाली.

प्रा. डॉ. एस. एस. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. एस. एम. कुंभार, प्रा. ए. बी. माने यांनी मार्गदर्शन केले. संयोजन प्रा. ए. आर. औंधकर, प्रा. ए. बी. माने, डॉ. टी. एस. भोसले, डॉ. एस. बी. पोळ, डॉ. बी. ए. सोनार यांनी केले.

दैनिक ललकार २/२/२०१९



# रामानंदनगर कॉलेजमध्ये वार्षिक क्रिडा स्पर्धा उत्साहात

पलूस दि. १ (वार्ताहर) - पलुस तालुक्यातील रामानंदनगर येथे आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालया अंतर्गत बॉक्स क्रिकेट, गोळाफेक, हॉलीबॉल आदी क्रिडा प्रकारांचा समावेश होता.

या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. मोहन चव्हाण, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्ही. बी. पाटील उपस्थित होते. स्पर्धेला शुभेच्छा देण्यासाठी राष्ट्रीय खेळाडू वैभव उगळे, सूनील तूपे उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद आणि कर्मवीर आण्णांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून क्रिडा ज्योत प्रज्वलनाने या स्पर्धेतचे उद्घाटन करण्यात आले.

या स्पर्धेचे संयोजन जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संदेश दौंड, क्रिडा शिक्षक सुरज पाटील यांनी केले. या स्पर्धेसाठी चॅलेंजर ग्रुप भिलवडीच्या खेळाडूंनी पंच म्हणून काम पाहिले.

पुढारी

दि. ४-२-२०१५



रामानंदनगर: येथे आर्टस, सायन्स, कॉमर्स महाविद्यालयात आयोजित संशोधनात्मक अध्यापन शास्त्र कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. सुरेश साळुंखे आणि कर्मवीर मंचावर विषयतज्ज्ञ मान्यवर.

## रामानंदनगर कॉलेजमध्ये कार्यशाळा

**किर्लोस्करवाडी :** पलूस तालुक्यातील रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजचा प्राणीशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमाअंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा झाली. संशोधनात्मक अध्यापन शास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. एस. एस. पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे अध्यक्षस्थानी होते, या कार्यशाळेत डॉ. एस. एम. कुंभार, प्रा. ए. बी. माने या विषयतज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. संयोजन प्रा. ए. आर.औंधकर, प्रा. ए. बी. माने, डॉ. टी. एस. भोसले, डॉ. एस. बी. पोळ, डॉ. बी. ए. सोनार यांनी केले.

सकाळ रविवार, ३ फेब्रुवारी २०१९ ३

# रामानंदनगरमध्ये अध्यापन शास्त्र कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

अंकलखोप, ता. २ : रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा प्राणिशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत 'संशोधनात्मक अध्यापन शास्त्र' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा झाली.

प्रमुख पाहुणे म्हणून पलूस कॉलेजचे प्रा. डॉ. एस. एस. पाटील, तर प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे उपस्थित होते. या कार्यशाळेत डॉ. एस. एम. कुंभार, प्रा. ए. बी. माने यांनी मार्गदर्शन केले. संयोजन प्रा. ए. आर. औंधकर, प्रा. ए. बी. माने, डॉ. टी. एस. भोसले, डॉ. एस. बी. पोळ, डॉ. बी. ए. सोनार यांनी केले.

तरुण भारत ▪ मंगळवार, ५ फेब्रुवारी २०१९,

# 'रामानंदनगर'मध्ये क्रीडा स्पर्धा

**पलूस :** पलुस लालुक्यातील रामानंदनगर येथे आर्टस् सायन्स अँड. कॉमर्स कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा झाल्या. कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालया अंतर्गत बॉक्स क्रिकेट, गोळाफेक, हॉलीबॉल आदी क्रीडा प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. मोहन चव्हाण, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्ही. बी. पाटील उपस्थित होते. स्पर्धेला शुभेच्छा देण्यासाठी राष्ट्रीय खेळाडू वैभव उगळे, सूनील तूपे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद आणि कर्मवीर आण्णांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून क्रीडा ज्योत प्रज्वलनाने या स्पर्धेतचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेचे संयोजन प्रा. संदेश दौंडे, सुरज पाटील यांनी केले.

तरुण भारत
सांगली
मंगळवार दि. ५ फेब्रुवारी २०१९

# अध्यापन तंत्राच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान

प्रतिनिधी
पलूस

पलूस तालुक्यातील रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस् सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेजचा प्राणीशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमाअंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. संशोधनात्मक अध्यापन शास्त्र या विषयावर ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून पलूस कॉलेजचे प्रा.डॉ. एस. एस. पाटील, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे उपस्थित होते.

या कार्यशाळेत डॉ. एस एम कुंभार, प्रा.ए.बी.माने या विषयतज्ञांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे संयोजन प्रा.ए.आर.औंधकर, प्रा. ए.बी.माने, डॉ. टी.एस. भोसले, डॉ. एस.बी.पोळ, डॉ. बी.ए.सोनार यांनी केले. बदलत्या तंत्रज्ञानाने शिक्षण सुखकर आणि वेगवान झाले आहे असल्याचा मनोदय यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. एस.एस. पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी प्राचार्य डॉ.साळुंखे म्हणाले, काळ झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे आलेली अस्थिरता लक्षात घेता तुमच्या जॉबमध्ये होणाऱ्या बदलांचा विचार करता बहू विषयांचे ज्ञान आवश्यक आहे. सायन्सच्या विद्यार्थ्यांना अकांऊटचेही ज्ञान असणे गरजेचे आहे. शाखांचा रेषा आता पुसट होत असून शासनाने अँटोनॉमस धोरण स्विकारले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार आता आर्ट्स सायन्स कॉमर्स या सगळयांचा अभ्यास एकत्रित करणे शक्य आहे.

गुगल क्लासरूम, युट्यूब, ऑनलाईन टिचींग हे तत्र आता आपण विकसित केले पाहिजे. या पुढील काळात शिक्षकांना अध्यापन तंत्राच्या विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी केले.



**पलूस : रामानंदनगर येथे संशोधनात्मक अध्यापन शास्त्र कार्यशाळेत बोलताना प्रा.डॉ. सुरेश साळुंखे बाजूस मान्यवर.**